आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ जानेवारी २०१२ | वर्ष २८ | अंक १९

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



## मा. शरद जोशी यांना 'चतुरंग' प्रतिष्ठानच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार प्रदान

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १९ । ६ जानेवारी २०१२

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


■ वृत्तांत
**मा. शरद जोशी यांना 'चतुरंग' प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान**
गंगाधर मुटे ........ २

■ **मानवंदना**
(मा. शरद जोशी यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्रावरील मजकूर) ........ ६

■ आजकाल
**तुमची स्वप्ने आमची माती**
ज्ञानेश्वर शेलार ........ ८

■ कॉमन नॉन सेन्स
**लोकपाल नव्हे अण्णापाल**
सुधाकर जाधव ........ १०

■ मुद्दा
**उदंड जाहली पॅकेजेस**
गिरधर पाटील ........ १३

■ विचार
**विकासाची नवी दृष्टी स्वीकारणार केव्हा?**
अमर हबीब ........ १४

■ **शेतकरी संघटना वृत्त** ........ १५




**मा. शरद जोशी यांना देण्यात आलेल्या 'चतुरंग' प्रतिष्ठान जीवनगौरव पुरस्कार प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेली 'दैनंदिनी २०१२'**
**यात मा. शरद जोशी यांचेवरील विविध विचारवंतांचे लेख संकलित करण्यात आले आहेत. पुस्तकाच्या निवडक प्रती संघटक कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मूल्य १५० रु.**

# मा. शरद जोशी यांना 'चतुरंग' प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान

मुंबईतील 'चतुरंग प्रतिष्ठान' संस्थेचा या वर्षीचा सामाजिक क्षेत्रासाठी असलेला 'जीवनगौरव' पुरस्कार शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांना प्रदान करण्यात आला. भारतासारख्या शेतीप्रधान देशात, सर्वदूर पसरलेल्या शेतकऱ्यांची मोठी संघटना बांधण्याचा आणि त्यांच्या शेतीविषयक बहुविध प्रश्नांची तड लावण्यासाठी कृतीशील चळवळ उभारण्याचा जो ध्यास श्री. शरद जोशी यांनी आयुष्यभर धरला, त्यासाठी अथक प्रयत्न केले, शेतीमालाला वाजवी भाव मिळावा, शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य व्हाव्यात, त्यांच्या प्रश्नांचा साकल्याने विचार साहित्य प्रस्तृत करून समाजमनात शेतकरी बांधवाविषयी जागृती निर्माण व्हावी, तसेच ग्रामीण महिलाही संघटित होऊन कार्यरत व्हाव्यात अशा बीजस्वरुपी समाजकार्याचा विचार करून कृतिशील चळवळ उभारणाऱ्या त्यांच्या जीवनध्येयाचा आणि त्यासाठी त्यांनी केलेल्या अथक परिश्रमी कार्याचा आम समाजातर्फे सामाजिक जाणीवेतून कृतज्ञतापूर्वक गौरव व्हावा, या भावनेने चतुरंग प्रतिष्ठानने यंदाचा सामाजिक 'जीवनगौरव' पुरस्कार श्री. शरद जोशी यांना मुलुंड, मुंबई येथील कालिदास नाट्यगृहात १८ डिसेंबर २०११ रोजी संपन्न झालेल्या भव्य संमेलनात प्रदान करण्यात आला. उपस्थितांनी सुमारे पाच मिनिट उभे राहून प्रचंड टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट करून मा. शरद जोशींना मानवंदना दिली.



यावेळी शरद जोशी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना श्री. अनंत दीक्षित म्हणाले की, आजची ही संध्याकाळ देशाच्या दृष्टीने मौलिक अशी आहे. एकच दिसतो समोर तारा, परी पायतळी अंगार असे कवी कुसुमाग्रजांनी म्हटलेय, आज शरद जोशींना दिला जाणारा चतुरंग पुरस्कार लोकांमधून आलेला असल्याने हा पुरस्कार मोठा आहे, या पुरस्काराला औचित्य आहे; तरी देखील शरद जोशींचा देशपातळीवर मोठा गौरव होण्याची आवश्यकता होती, असे मला वाटते. अर्थात गौरव, पुरस्कार, समारंभ व मान्यता याच्या पलीकडे ते गेलेले आहेत.

'इंडिया विरुद्ध भारत' या संकल्पनेने पेटंट शरद जोशींनी घ्यावे, अशा तऱ्हेची मूलभूत संकल्पना त्यांनी समाजाला दिली. एकीकडे बदलणारा भारत दिसतो, एकीकडे न बदलणारा भारत दिसतो; एकीकडे इंडियात अणूवीज ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याची भारताची ताकद किती आहे, हे सांगितले जाते तर दुसरीकडे भारतात गाव हागणदारी मुक्त करण्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची तयारी सुरू असते. हा जो भारत आहे, त्या भारताचे दुखणे आणि नासणे कशात आहे, हे सांगणे फार अवघड आहे. अशा या आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये गौरवशाली व प्रभावशाली कार्य शरद जोशी यांनी केले आहे. समाज पुढे यावा यासाठी प्रसंगी अपयशांना देखील सामोरे जाऊन आयुष्यभर काम करणे जिकिरीचे जरी असले तरी शरद जोशींनी यशस्वीपणे निभावले आहे.

तीस वर्षांपूर्वी निपाणीला जेव्हा तंबाखूचे आंदोलन झाले, तेव्हा मला जोशींच्या कार्याविषयी पहिल्यांदा जवळून ओळख झाली. जन्म कुणाच्या पोटी घ्यावा, हे कुणाच्या हातात नसते; पण आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीच्या इतिहासामध्ये शरद जोशींचा जन्म कोणत्या जातीत झालेला आहे, हा प्रश्न बहुजन समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरलेला नाही. या अनुषंगाने महाराष्ट्राच्या इतिहासाचा विचार केला तर ज्यांच्या बाबतीत जन्म कोणत्या जातीत झालेला आहे, हा प्रश्न बहुजन समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरलेला नाही, असे पहिले नाव म्हणजे श्री. दांडेकर, दुसरे श्रीपाद डांगे, तिसरे आचार्य प्र. के. अत्रे आणि चौथे नाव म्हणजे शरद जोशी. शरद जोशींचे अनेक भाषांवर प्रभुत्व आहे. जितक्या सहजतेने ते शेतकरी समाजाशी मराठीमध्ये संवाद साधतात तितक्याच सहजतेने त्यांनी फ्रेंच भाषेमध्ये विदेशात भाषणे केलेली आहेत. त्यांना संस्कृतचे व्यासंगी प्राध्यापक व्हायचे होते. खरे तर शरद जोशी हे अलौकिक व्यक्तिमत्त्व आहे. हा मनुष्य शब्दाने, वर्णनाने किंवा वाचनाने समजेलच असेही नाही. हे व्यक्तिमत्त्व कुठल्यातरी साच्यात बसवता येणे कठीण आहे. सगळ्याच गोष्टी आयुष्यात शब्दांना झेपतातच असे नाही, त्याला कृतिशीलतेची सांगड असावी लागते. महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंत आणि चंडीगढपासून उत्तरप्रदेशापर्यंत विविध शेतकरी आंदोलनांचे नेतृत्व करणे हे काम वाटते तेवढे सोपे नाही. अर्थशास्त्र आणि संख्याशास्त्राचा उपयोग करून या शेतकरी योद्ध्याने अनेक चमत्कारिक गोष्टी लीलया साध्य केलेल्या आहेत. मोठमोठ्या अर्थशास्त्र्यांना समजायला कठीण जाईल असे अर्थशास्त्र शेतकऱ्यांना अगदी सहजतेने समजावून सांगण्याचा चमत्कार शरद जोशींनी घडवून आणला आहे. वारकरी संप्रदायाच्या भाषेत सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की सोप्यात सोपी गोष्ट कारण नसताना अवघड करून सांगतात त्यांना विद्वान असे म्हणतात आणि अवघडातील अवघड गोष्ट जे सोपी करून सांगतात, त्यांना संत असे म्हणतात. हा संतत्वाचा प्रभाव शरद जोशींमध्ये आहे म्हणूनच त्यांना ऐकायला लाखोंनी



महिलादेखील स्वखर्चाने त्यांच्या भाषणाला गर्दी करतात. भाषिकदृष्ट्या अस्मिता हरवलेला आणि दुभंगलेला समाज, जात, धर्म, भाषा, प्रांत आणि प्राचीन धर्म-परंपरेच्या अस्मितादर्शक गोष्टींपासून पूर्णपणे अलिप्त राहणारा पण रोजच पराभूत होणारा सामान्य माणूस जात-भाषा-धर्मवादी नाही, ही भूमिका जाहीरपणे घेऊन लोकसंगठन करण्याचे ऐतिहासिक कार्य शरद जोशी यांनी महाराष्ट्रात केलेले आहे.

कुठल्याही विषयावर मूलभूत आणि मूलगामी विचार करणे, हे आजच्या विचारप्रक्रियेच्या बाजारपेठेत अडचणीचे ठरत चाललेले असताना, लोकांना रुचेल तेच बोलायचे, अशी सर्वसाधारण पद्धत रूढ झालेली असल्यामुळे आपण आपली स्वतःची ओळख करून घेणेच विसरून गेलो होतो. अशा विपरीत स्थितीत शरद जोशींनी समाजाला स्वतःची ओळख करून घ्यायचे शिकविले, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने फार मोलाची बाब आहे. शरद जोशी म्हणतात की, प्रत्येक अनन्यसाधारण व्यक्ती ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे आपले जाणीवांचे आणि अनुभवांचे जग व्यापक करण्याच्या धडपडीत असतो. आयुष्य विविधतेने संपन्न व्हावे, निवड करण्याची संधी क्षणाक्षणाला मिळावी आणि प्रत्येक निवडीच्या वेळी अनेक विकल्प उपलब्ध व्हावेत, याचा शोध घेण्यासाठी मनुष्यप्राणी धडपडत असतो आणि हा शोध स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणारा असतो. शरद जोशी असेही म्हणतात की, सत्यापेक्षा स्वातंत्र्याचे मोल जास्त असते. इतिहासाकडे बघितले तर असे दिसून येते की, समाजाला स्वतःचे योग्य स्थान मिळवून देण्याच्या महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर यांनी सुरू केलेल्या लढाईच्या रणांगणातील शरद जोशी हे श्रेष्ठ लढवय्ये आहेत.

सत्काराला उत्तर देताना शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी म्हणाले की, आज मला बरेच दिवसानंतर काठीचा आधार न घेता स्वतःच्या पायावर उभा राहून बोलताना पाहून माझ्या सर्व शेतकरी सहकाऱ्यांना आनंद वाटत असेल. अलीकडे मला उठून उभेही राहता येत नाही, खुर्चीवर बसून बोलत असतो; पण आज मी सर्वांना सांगतो की, जोपर्यंत हिंदुस्थानातील सगळे शेतकरी संपूर्णतः कर्जमुक्त होत नाहीत तोपर्यंत मी डोळे कदापि मिटणार नाही.

माझ्या संबंध सामाजिक कार्याची सुरुवात मी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये जेव्हा सेकंड डेव्हलपमेंट डिकेड म्हणजे त्यांच्याकडे पंचवार्षिक योजनांऐवजी दहा वर्षांच्या योजना असतात, त्या समितीचा मी सदस्य होतो, तेथूनच झाली. त्या समितीच्या सदस्याच्या भूमिकेतून मी वेगवेगळ्या विशेषकरून लॅटीन अमेरिका आणि आफ्रिकेतील अनेक देशांचा दौरा केला तेव्हा हिंदुस्थानातील शेतकरी निरक्षर, आळशी आणि व्यसनी आहे, शिवाय लग्नप्रसंगी वगैरे अनावश्यक प्रचंड खर्च करतो म्हणून हिंदुस्थानातील शेतकरी गरीब आणि



कर्जबाजारी आहे असे हिंदुस्थानासहीत युरोपातील शेती संबंधातील सर्व पुस्तके सांगत होती. सर्व अर्थशास्त्र्यांमध्ये अशा तऱ्हेच्या कुभांड रचणाऱ्या विचारांना मान्यता होती. अशा कुभांडी विचारांना खोडून काढण्याचे ऐतिहासिक कार्य माझ्या हातून घडले, हे विनम्रतेने मी मान्य करतो.

शेतकरी संघटनेच्या प्रारंभीच्या काळात मी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमध्ये जात असे आणि नेहरूंच्या समाजवादी धोरणांमुळे हे सर्व संकट भारतावर कोसळले आहे असे सांगत असे. शेतीचे शोषण केल्याखेरीज समाजवादी उद्योगधंद्याचे पोषण होणार नाही अशी समाजवादी विचारसरणी बाळगून पंडित नेहरू असमतोलाच्या दीडदांडी तराजूच्या आधाराने औद्योगिक विकास साधण्यासाठी शेतीतील कच्च्या मालाचे शोषण करीत आहे, असे मी त्यावेळी सांगत असे आणि शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी विकासाचा व गरिबी निर्मूलनाचा कार्यक्रम आहे, असे मी फार आग्रहाने मांडत असे.

जपानी लोकांमध्ये खूप देशभक्ती आहे म्हणून जपानी लोक श्रीमंती आणि वैभवाकडे गेलेले नाहीत तर १९२१ सालापासून जपानमध्ये तयार होणाऱ्या भाताला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असणाऱ्या भावापेक्षा पाचपट अधिक भाव मिळत आहे. त्यामुळेच तेथील शेतकऱ्यांच्या हातात पैसे आले आणि त्यातूनच तेथील शेतकऱ्यांनी छोटेछोटे गृहउद्योग सुरू केलेत. नंतर त्या गृहउद्योगात तयार झालेल्या वस्तूंच्या जोडणीचे कारखाने सुरू झालेत आणि त्यातूनच त्या देशाचा औद्योगिक विकास झाला. आजही जपानमध्ये टोयाटोसारखे मोठमोठे कारखाने गावात पाहायला मिळतात. कारखानदारीच्या विकासाकरिता जपान्यांना कधी शहराकडे धाव घेण्याची गरज पडली नाही. शेतमालाला भाव मिळाला पाहिजे हे जपानमध्ये अगदी १९२१ सालापासूनच मान्य करण्यात आले. नंतर चीननेही अशाच तऱ्हेच्या धोरणांचा अंगिकार केला; मात्र पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानात शेतीचे मरण ठरेल अशाच तऱ्हेचे धोरण आखल्या गेले. शेतीमालाला रास्त भाव मिळताच कामा नये, अशा तऱ्हेचे अधिकृत धोरण पंडित नेहरूंनी राबविले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दस्तावेजात आजही याचे अधिकृत पुरावे उपलब्ध आहेत.

अशा तऱ्हेचे धोरण राबविल्या गेल्यामुळेच शेतमालाला रास्त भाव मिळाला नाही आणि शेतकरी कर्जात बुडाला. आज देशात शेतकरी आत्महत्या होत आहे त्यात कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या फार मोठी आहे. शेतकरी आत्महत्यांची संख्या कापूस उत्पादक क्षेत्रात जास्त आहे, कारण शेतमालाचा विचार करता सगळ्यात जास्त लूट कापूस या पिकाची झाली आहे. जर का आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाचे भाव २१० रुपये असतील तर हिंदुस्थानात कापसाला कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया- १०० रुपयापेक्षा जास्त भाव दिले नाही. महाराष्ट्रामध्ये गेली अनेक वर्षे कापूस एकाधिकार योजनेखालीच कापसाची खरेदी होत असल्याने विदर्भातील शेतकऱ्यांना ६० रुपयाच्या वर कधीच भाव मिळाले नाहीत. जगाच्या बाजारपेठेत २१० रु. भाव असताना विदर्भात कापसाला केवळ ६० रुपयेच मिळाल्याने विदर्भातील शेतकऱ्यांवर आत्महत्येचे संकट ओढवले आहे. आतापर्यंत एक लक्ष साठ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. याला वंशविच्छेद असा शब्द वापरता येईल. असा वंशविच्छेद होऊनही अजूनपर्यंत शहरातील कोणत्याही माणसात याविषयी थोडीसुद्धा कणव निर्माण झाली नाही. याविषयी आपले काहीतरी चुकत असावे, आपण विचार करायला हवा.



गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि त्यासाठी ग्रामीण महिलांना काही किलोमीटर अंतरावरून डोक्यावर घागर घेऊन पाणी आणावे लागते, हा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही गावाच्या मध्यभागी एक हौद बांधावा आणि त्यात मोटर पंपाच्या साहाय्याने पाणी आणून सोडावे, जेणेकरून महिलांचे जगणे सुसह्य होईल, असा विचार करून कामाला लागलो तेव्हा त्याच गावातील एक म्हातारी आजीबाई येऊन माझ्या बायकोला म्हणाली की, बाई तुम्ही सर्व करा पण पाण्यासाठी गावात हौद बांधू नका कारण सध्या सासुरवाशीण मुलींना आपसातले दुःख एकमेकींजवळ व्यक्त करायला निदान पाणवठा ही एकतरी जागा उपलब्ध आहे. तुम्ही जर हौद बांधला तर त्यांची आपसातील दुःख व्यक्त करण्याची एकमेव जागाही कायमची बंद होईल.

मी शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव मिळायला हवे, अशी मांडणी केली तेव्हा सुरुवातीला खूप वादविवाद झालेत. उत्पादन खर्च कुणी व कसा काढायचा याविषयीही उहापोह झाला तेव्हा शेतीमध्ये जे उर्वरक, बियाणे, कीटनाशके लागतात त्याचा एक इंडेक्स तयार करावा असे काहींनी मांडले. मला मात्र शेतीमालाचा उत्पादनखर्च सरकारी यंत्रणांनी काढावा, हे अजिबात पटत नाही, कारण शेतमालाला रास्त भाव न मिळण्यात सरकार हाच सर्वांत मोठा अडसर आहे. सरकार समस्या क्या सुलझाये, सरकार यही समस्या है।

कोणत्याही बाजारपेठेमध्ये जर पूर्णपणे खुली व्यवस्था असेल आणि त्यात अनावश्यक सरकारी लुडबूड नसेल, केव्हाही शेतमालाची निर्यातबंदी करायची, वाटेल तेव्हा आयात करून शेतमालाचे भाव पाडायचे, अशा तऱ्हेचे उपद्व्याप जर सरकारने केले नाहीत आणि त्याच बरोबर शेतमालाच्या प्रक्रियेवरती, वाहतुकीवरती जर सरकारने बंधने लादली नाहीत तर या व्यवस्थेत मिळणारी किंमत शेतकऱ्यांना मान्य होण्यासारखीच असेल याची मला खात्री आहे.

डॉ. अरुण टीकेकर यांचे अध्यक्षतेखालील डॉ. द. ना. धनागरे, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. विनय सहस्रबुद्धे, श्री. अविनाश धर्माधिकारी, श्री. सुधीर जोगळेकर आणि सौ. प्रफुल्ला डहाणूकर या मंडळींनी यंदाच्या २१ व्या जीवनगौरव पुरस्काराच्या निवड समितीचे कामकाज पाहिले. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लक्ष रुपये असे पुरस्कार स्वरूप असलेला हा जीवनगौरव पुरस्कार यापूर्वी सामाजिक क्षेत्रासाठी श्रीमती इंदिराबाई तथा मावशी हळबे (१९९२), डॉ. इंदुमती गोवर्धन पारिख (१९९५), श्रीमान पांडुरंगशास्त्री आठवले (१९९९) आणि श्रीमान नानाजी देशमुख (२००३) आणि साधनाताई आमटे (२००७) या मान्यवरांना देण्यात आला होता.

'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान सोहळ्याला डॉ. अरुण टिकेकर, श्री. अनंत दीक्षित, डॉ. द. ना. धनगरे, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. विनय सहस्रबुद्धे, श्री. सुधीर जोगळेकर, श्री. अविनाश धर्माधिकारी, सौ. प्रफुल्ला डहाणूकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नरेंद्र बेडेकर यांनी तर मानपत्र वाचन श्री. तुषार दळवी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुधीर जोगळेकर, गौरवपर भाषण श्री अनंत दीक्षित, अध्यक्षीय भाषण डॉ. अरुण टिकेकर तर समारोपीय आभार प्रदर्शन श्री विद्याधर नेमकर यांनी केले.

- गंगाधर मुटे

# मानवंदना

## आदरणीय शरद जोशी यांना 'चतुरंग' प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आलेल्या मानपत्रावरील मजकूर

अंगारमळ्याचा योद्धा शेतकरी सन्मानीय शरद जोशी यांस ...

नाडलेल्या-पिचलेल्या आणि सगळ्यांकडूनच लाथाडल्या गेलेल्या भारतीय शेतकऱ्याला अस्मितेच्या हुंकाराची जाणीव करून देणाऱ्या, भारतीय दारिद्र्यांचं मूळ शेतमालाच्या अपुऱ्या किमतीत आहे हे शास्त्रशुद्धरीत्या-सप्रमाण सिद्ध करणाऱ्या, पैशाचं, सत्तेचं वा नेतृत्वाचं कुठलंही पाठबळ नसताना, स्वच्छ विचारांच्या आधारावर प्रभावी लोकशक्ती उभी करून प्रस्थापित यंत्रणेविरुद्ध संघर्ष छेडणाऱ्या आणि इंडिया विरूद्ध भारताची अभिनव मांडणी करून, न बदलणाऱ्या भारताला बदलण्याच्या टप्प्यावर आणून सोडणाऱ्या, आपल्या चळवळीनं साडेतीन दशकांची वाटचाल पुरी करून स्वतंत्र भारताच्या कृषी-वाटचालीत जो चमत्कार घडवला आहे, तो स्वातंत्र्याच्या कक्षा रूंदावणारा तर आहेच, शिवाय सार्वजनिक जीवनातही आत्ममग्न राहताना आपल्यातल्या अंतर्नादाला जपत, आपलं स्वतः चं राजहंसी वेगळेपण जपता येतं हे सिद्ध करणारा आहे; याचाच आम्हाला विलक्षण अभिमान आहे...

साताऱ्यातील मिशनरी शाळेत शिकल्यानं बायबलच्या प्रभावाखाली वाढलेले वडील आणि पंढरपूरचे बडवे मंडळींच्या विक्षिप्त वागणुकीची घृणा येऊन ब्राह्मणी कर्मठपणाला चार हात लांब ठेवलेली आई, हा आपणास लाभलेला संपन्न पैतृक व मातृक वारसा. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे गावोगावी शिकता शिकता, १९५१ साली पार्ल्याच्या टिळक विद्यालयातून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेली शालान्त परीक्षा. पुढे १९५७ साली मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम येऊन सुवर्णपदकासह उर्त्तीर्ण केलेली एम. कॉम.ची परीक्षा, हे आपलं भौतिक शिक्षणविश्व. आपलं मन ओढ घेत होतं सनदी सेवेकडे, पण जीवनातील अपरिहार्यता आपणास ढकलत होती प्राध्यापकीकडे.

सुदैवानं वा योगायोगानं तो प्राध्यापकीचा काळ अवघा वर्षाचाच ठरला आणि लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपण रुजू झालात ते इंडियन पोस्टल सर्व्हिसमध्ये.

जेमतेम दहाएक वर्षेच नोकरी झाली आणि १९६८ साली आपणापुढे पर्याय आला संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक पोस्टल युनियनच्या स्वित्झर्लंडमधील मुख्यालयात, चीफ, इन्फर्मेशन सर्व्हिस, इंटरनॅशनल ब्युरो या पदावर रुजू होण्याचा. संयुक्त राष्ट्रसंघात तेव्हा विकासाच्या दुसऱ्या दशकाची आखणी सुरू होती. त्या आखणीतली विकास-दशकांची संकल्पना ऐकूनच आपण अस्वस्थ झालात. मोठ्या राष्ट्रांनी छोट्या राष्ट्रांना आणि विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना मदत करण्याचे प्रकार म्हणजे दुसरं तिसरं काहीही नसून तो जागतिक भिकेचाच आधुनिक प्रकार आहे, हे आपण जाणलंत आणि तिथून लवकरात लवकर बाहेर पडायचा विचार केलात. मदत देण्याच्या अटी आणि त्या बदल्यात लादल्या जाणाऱ्या व्यापाराच्या अटी अविकसित देशांना कशा नागवतात, या मागचं भयानक सत्य जसजसं प्रकाशात येऊ लागलं, तसतसं दारिद्र्याच्या मूळ प्रश्नावर उत्तरं शोधण्यासाठी भारतात परतलं पाहिजे आणि प्रत्यक्ष शेती करून शेतकऱ्याला जागं केलं पाहिजे या एकाच विचारानं आपणास भंडावून सोडलं, आणि आपण हिंदुस्थानात परतलात, ऐन आणीबाणीत...

आपण जाणूनबुजून शेती करायची ठरवलीत तीही कोरडवाहू जमिनीत. आपण आपल्या घरचं नाव ठेवलंत मृदगंध, तर शेतीचं नाव ठेवलंत अंगारमळा... तिनेक वर्षे त्या जमिनीत पैसा आणि तंत्रज्ञान ओतल्यानंतरही जेव्हा हाती काहीच लागलं नाही, तेव्हा आपली खात्री पटली, शेतकऱ्याच्या दारिद्र्याचं मूळ कशात दडलं आहे याविषयीची. शेती हा उपभोग्य वस्तूंचा गुणाकार करणारा एकमेव व्यवसाय. स्वतः कष्ट करून काही निर्माण करण्यापेक्षा दुसऱ्यानं निर्माण केलेलं लुटणं हे केव्हाही फायदेशीर, हीच इतिहासाची दुर्दैवी पण खरी प्रेरणा. ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करून शहरांना झुकत माप देणारी इथली यंत्रणा, छोट्या शेतकऱ्याला नागवून, पुढारी शेतकऱ्यालाच शासकीय योजनांचा मलिदा खाऊ घालणारे इथले अधिकारी, पन्नास पैशांचं नाणं धुळीत पडलं तर ते शोधण्यासाठी डोक्यावर उन्हाचा पारा घेणारी इथली ग्रामीण म्हातारी आणि ऐकेका वेळेस ताजमहलसारख्या महागड्या हॉटेलात पाच-पाच हजार रुपये उडवणारी इथली तरुणाई, हे इंडिया आणि भारत यांच्यामधल्या फरकाचं वास्तव... आपण शेतकऱ्याला जाग केलंत, ते या शोषणाच्या विरोधात शेतकरी अंदोलन उभं करून... १६ फेब्रुवारी १९८० हा दिवस शेतकरी आंदोलनातला महत्त्वाचा दिवस. त्या दिवशी पेटला कांदा अन् मग सुरुवातच झाली, तंबाखू, ऊस आणि कापसाला हमीभाव मिळावा यासाठी आंदोलन छेडण्याची. १९८२ च्या जानेवारीत सटाण्यात भरलेलं, तीसेक हजार शेतकऱ्यांच्या उपस्थितीतलं शेतकरी संघटनेचं पहिलं अधिवेशन हा तर चळवळीतला मैलाचा दगडच ठरला. आपण या अधिवेशनात मंत्र दिलात तो शेतकऱ्यानं यापुढे लाचार होऊन जगायचं नाही असा आणि आपण याच अधिवेशनात एक कलमी कार्यक्रम दिलात तो शेतमालाला रास्त भाव या मागणीचा... पण त्याहीपेक्षा हे अधिवेशन सर्वार्थानं महत्त्वाचं ठरलं, ते चळवळीच्या व्यासपीठावर प्रथमच झालेल्या शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नांची स्वतंत्र चर्चा करण्यानं... चांदवडच्या शिदोरीचा, नव्हे, चळचळीच्या पहिल्या महिला अधिवेशनाचा जन्म, हा खरा तिथलाच...

लूटमारीच्या व्यवस्थेत जिंको कुणीही, हरो कुणीही, पण खऱ्या अर्थानं हरतात त्या स्त्रियाच, हे आपण समोर आणलेलं वास्तव आपल्या चळवळीला बळ देणारं ठरलं... खेड्यापाड्यांतल्या लक्षावधी स्त्रिया आपल्या चळवळीत सहभागी तर झाल्याच, शिवाय सातबाराच्या उताऱ्यांवर त्यांची नावं जमिनीचे सहमालक म्हणून लागली, ती केवळ आपल्यामुळेच...

आपलं आणखी एक महत्त्वाचं कार्य म्हणजे हरित क्रांतीच्या पुढच्या जनुक क्रांतीच्या पावलाला आपण दिलेला मुक्त पाठिंबा... आधुनिक तंत्रज्ञानाचा हिरीरीने आणि निःसंदिग्धपणे आपण पुरस्कार केलातच, शिवाय पिकावर पडणाऱ्या संभाव्य किडीला प्रतिबंध करणारं

तंत्रज्ञान नाकारणं म्हणजे ज्ञानाला संकुचित करणं आहे, हे आपण शेतकऱ्याला पटवूनही दिलंत... आपण स्वतः पूर्णतः अर्थवादी आहात, त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आंदोलनाला अर्थविचार आहे, हे न मानणाऱ्या व्यवसायिक अर्थशास्त्रांशी आणि विद्वचर्चा करीत बसणाऱ्या अर्थतज्ज्ञांशी आपलं कधीच जमलं नाही... आपण शेतकरी चळवळीला अर्थविचारही दिलात आणि तो देता देता एकाच दगडात अनेक पक्षीही मारलेत... आपण प्रत्यक्ष शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरवलंत, देशातील अर्थव्यवस्था खचत चालली आहे, विकास खुंटला आहे, गरिबी वाढते आहे असे म्हणण्याची स्टाइल झाली असताना, ती परिस्थिती सुधारण्याइतका विश्वास आपणच लक्षावधी शेतकऱ्यांच्या आंदोलनातून अभिव्यक्त करून दाखवलात आणि शेतकरी-शेतमजुरांचा कैवार घेत, प्रत्यक्षात कामगारांचेच भले पाहणाऱ्या डाव्यांची, सर्व आर्थिक-राजकीय समीकरणे आपण विस्कटून टाकलीत... शेतकरी चळवळीतल्या स्त्रियांच्या उस्फूर्त आणि प्रामाणिक सहभागानं स्त्री-मुक्ती चळवळीतल्या अनेक स्त्री नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या, पण त्या दिखाऊ स्त्री नेतृत्वाला आगगाडीसंच, विमानसंच आणि जेटसंच अशा तीन फळ्या समोर आणून आपण मुक्तीवादी चळवळीच्या चिंधड्याच उडवल्यात... जातीय-पंथीय वा धार्मिक अभिनिवेश आपण व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातही चार कोस दूर ठेवलात, म्हणूनच नाशिकचे माधवराव मोरे तुमची बाजू घेत कडाडून उभे राहिले... आणि म्हणूनच ज्यांचं ब्राह्मण्य, त्यांच्या बहुजनसमाजातील लोकप्रियेतेच्या आड कधीही येऊ शकलं नाही, अशा मोजक्याच नेतृत्वांमध्ये कॉम्रेड डांगे, आचार्य अत्रे, सोनोपंत दांडेकर, पांडुरंगशास्त्री आठवले, आणि नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जोडीने नाव घेतले गेले, ते आपले... आपण राजकारणात प्रवेश केलात, शेतकऱ्यांचा पक्षही काढलात, आपल्या पक्षाचे आमदार निवडून आले, आपणही खासदार झालात, देशविदेशातल्या प्रसिध्दी माध्यमांनी आपल्या नेतृत्वाचा उदोउदो करणारे विशेषांकही काढले, पण तरीही राजकरण आपल्याला फारसे भावले नाही, हेच खरं...



'शेतकरी संघटक' हे आपल्या चळवळीचं मुखपत्र... तर 'योद्धा शेतकरी' हे विजय परुळकारांनी आपल्यावर लिहिलेलं चरित्रात्मक पुस्तक... शेतकरी संघटनेच्या ऐन चळवळीच्याच धकाधकीत आपण विपुल लेखन केलंत, त्यातलं काही पुस्तकरूपानं प्रकाशितही झालं, पण बरंच काही लिहायचं राहूनही गेलं... चळवळ ऐन बहरात असताना आपण देशभर फिरलात, प्रसंगी प्रेमाच्या माणसांनाही लाथाडून फिरलात... पण ते लाथाडणं नव्हतंच... ते होत रक्ताच्या नात्यापेक्षाही जवळच्या वाटणाऱ्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी स्वीकारणं... दोनच वर्षांनी झालेलं पत्नीचं निधन, त्यापाठोपाठ आलेला हृदयविकाराचा झटका, मधुमेह, अर्धांगवायू आणि बायपासनं पोखरलेलं शरीर...

त्यातच पुढल्या पाच-दहा वर्षांत झालेली दोन्हीही कन्यांची लग्नं... आणि दोघींचंही लग्नानंतरचं परदेशी स्थायिक होणं... याच काळात शेतकरी संघटनेच्या भवितव्याची चर्चा या ना त्या कारणाने होत राहिली... शेतकरी संघटना हा विझलेला निखारा ठरतोय असेही आरोप होत राहिले... पण आपण ठाम होतात, कारण १९८१ सालीच आपण लिहून ठेवलं होतंत, की, ''या विचाराला जेमतेम १५-२० वर्षाइतकंच महत्त्व आहे... कुणी जर म्हटलं, की हा विचार कालातीत आहे, त्याचा एक धर्म झाला पाहिजे, तर तो शुद्ध मूर्खपणा ठरेल...'' आपण पुढे जाऊन असंही म्हणाला होतात, की ''शेतकरी संघटना हा एक स्पेण्ट फोर्स बनला आहे, आज तरी येणाऱ्या उषःकालची अंधुकशीही छटा पूर्वक्षितिजावर दिसत नाही...''

माननीय शरदजी, सॉमरसेट मॉम हा आपला आवडता लेखक... त्याचा तुच्छतावाद आपल्याला कधीच जमलं नाही, ते आपल्याला या अंगभूत तुच्छता-प्रेमामुळेच... तत्त्वांना मुरड न घालणारा आपला स्वभाव आणि आपल्यातल्या जन्मजात चांगुलपणा, चळवळीच्या धकाधकीत काहीसा गुदमरला... एकांड्या विचारवंताचा आपला पिंड, पण विचारपूर्वक स्वीकारलेल्या दिव्य दाहक तरीही सतीच्या वाणासारख्या व्रतरूपी चळवळीत आपण त्याची कोंडी होऊ दिली नाहीत... आम्हाला त्याचाच अभिमान आहे... त्यामुळेच आपली वाटचाल चळवळीतल्या पहिल्या पिढीलाच नव्हे, तर पुढच्या, त्या पुढच्या अशा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, याचा विश्वास आम्हाला वाटतो... चतुरंग प्रतिष्ठाननं जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवलं आहे, ते आपल्यातल्या या विचारवंताला, पिढ्यापिढ्यांच्या प्रेरकत्त्वाला! म्हणूनच या वर्षाचा सामाजिक क्षेत्रातील कार्याचा, 'चतुरंग जीवनगौरव पुरस्कार' आपल्याला अर्पण करताना आम्हाला अतीव आनंद होत आहे!!

मानपत्र शब्दांकनः सुधीर जोगळेकर
आणि
चतुरंग जीवनगौरव पुरस्कार निवड समिती
१८ डिसेंबर २०११

# तुमची स्वप्ने आमची माती

रिझर्व्ह बँकेने भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वारंवार व्याजदर वाढवण्याची उपाययोजना केली आहे. या उपाययोजनेमुळे कर्जवितरणावर परिणाम होऊन बाजारातील चलनाचा पुरवठा कमी झाला आहे. त्याचाच परिणाम म्हणून औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे. जागतिक मंदीमुळे निर्यातीलाही मर्यादा पडल्या आहेत. साखर, कापूस, कांदा वगैरे शेती उत्पादनांवरती सरकारने निर्यातबंदी लावल्यामुळे आणि जागतिक बाजारपेठेत कापसाची आणि साखरेची मुबलकता असल्यामुळे तसेच आपण उशिरा जागतिक बाजारपेठेत उतरल्याने त्यांनाही जागतिक बाजारपेठेत उठाव नाही. अशा औद्योगिक आणि कृषिमालाच्या निर्यातीच्या मंदीच्या काळातच सोनिया गांधींना हे सर्व गरिबांना घास भरवण्याचे स्वप्न पडले आहे.



ज्ञानेश्वर शेलार

देशभर भ्रष्टाचार विरोधात लढा चालू असतानाच भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारे अन्नसुरक्षा विधेयक संसदेच्या पटलावर ठेवण्यात आले आहे. सुरुवातीला विरोध करणारे पक्ष आणि देशाचे कृषिमंत्री यांनीही निवडणुकांवर डोळा ठेवून फक्त काँग्रेसलाच गरिबांची भूक मिटवण्याची योजना राबवण्याचे संपूर्ण श्रेय मिळू नये यासाठी विरोध करणे बंद केले आहे. मूळात ही योजना सोनिया गांधींच्या स्वप्नातील योजना आहे. असा प्रचार करण्यात येत आहे. देशातील कुणीही भुकेले राहू नये हा या योजनेचा उद्देश आहे. देशात सध्या एकशे वीस कोटी लोकसंख्ये पैकी २०% लोकसंख्या म्हणजे २० ते २१ कोटी लोक हे अर्धपोटी किंवा एकाच वेळची भूक भागवित आहेत. ही गोष्ट देशासाठी अतिशय लांच्छनास्पद आहे. हे लांच्छन कायमचे पुसून टाकण्याचे सोनिया गांधींचे स्वप्न आहे आणि या योजनेने ते साकार होणार आहे, असे सांगितले जाते. योजनेला मंत्रिमंडळाने रविवार २५ डिसेंबर रोजी मंजुरी दिली आहे. २६ डिसेंबरला ते पटलावर मांडण्यात आले व त्यावर चर्चा होऊन ते पास होणे आता अजिबात अशक्य नाही. या योजने अंतर्गत ६३% लोकसंख्येला स्वस्त अन्नधान्य मिळण्याची शाश्वती मिळणार आहे. अन्नधान्य सबसिडीत २७ हजार ६६३ कोटींनी वाढ होऊन ती ९५ हजार कोटींवर जाणार आहे. या कायद्यातील तरतूदींनुसार प्राधान्यक्रमाच्या कुटुंबांना दरडोई, दरमहा सात किलो तांदूळ, गहू आणि डाळ मिळेल. गहू २ रु. किलो व तांदूळ ३ रु. किलो भावाने दिला जाईल. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सुमारे साडेतीन लाख कोटी खर्च येईल, असे अन्नपुरवठा मंत्री के. व्ही. थॉमस यांनी सांगितले आहे.

या कायद्यातील तरतूदींनुसार सर्वसामान्यांचे दोन विभाग करण्यात आले आहेत. बीपीएल प्राधान्यक्रम तर बीपीएल कुटुंब साधारण गटात मोडणार आहे. ७५% ग्रामीण व ५०% शहरी लोकसंख्येला कायद्याचा लाभ देण्याची योजना आहे. यापैकी ४६% ग्रामीण व २८% शहरी लोकसंख्या प्राधान्य गटात आहे. नैसर्गिक संकटाच्या काळात म्हणजे दुष्काळ, महापूर या काळात धान्य वाटप न झाल्यास रोखीन सबसिडी दिली जाणार आहे. सबसिडीवरील खर्च ९५ हजार कोटींवर जाईल. धान्याची गरज ५.५ कोटी टनांवरून ६.१ टन होईल. गर्भवती महिला, स्तनदा माता, मुले, निराधार, बेघर, भूकबळीचा सामना करणाऱ्यांसाठी खास तरतूदही या कायद्यान्वये करण्यात आली आहे. गर्भवती व स्तनदा मातांसाठी पोषक आहारासाठी सहा महिन्यांपर्यंत दरमहा एक हजार रुपये दिले जातील.

हे बिल मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर व संसदेतील चर्चेनंतर स्थायी समितीकडे पाठवले जाणार आहे. चर्चेला भरपूर वेळ मिळणार आहे. या बिलाचा सर्व समावेशक असा अभ्यास केल्यानंतर त्यासाठी आवश्यक असणारे धान्य कोठून मिळणार हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. कृषिमंत्र्यांनी सुरुवातीला या बिलाला विरोध करताना हाच मुद्दा उपस्थित केला होता; परंतु देशात होऊ घातलेल्या पाच राज्यांतील निवडणुका जवळ आल्याने त्यांनीही आता बिलाला होकार दिला आहे. सोनिया गांधी एवढी मोठी योजना गरिबांसाठी राबवित असताना इतर पक्षांनीही त्याला पाठिंबा देण्याचीच भूमिका घेतली आहे. बिल पास होण्यासाठी आतातरी संसदेत कुठलाही अडथळा शिल्लक राहिलेला नाही. सोनिया गांधींचे हे स्वप्न लवकरच साकार होणार असले तरी, त्याची किंमत मात्र सोनिया गांधींना काँग्रेस पक्षाला किंवा त्यांना पाठिंबा देणाऱ्या कोणत्याही इतर पक्षाला मोजावी लागणार नाही. त्याची किंमत द्यावी लागणार आहे, देशातील आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या शेतकऱ्यांना! सोनिया गांधींना देशात कोणीही उपाशी राहिलेले नाही, अशी स्वप्ने पडत असतील. शेतकरी मात्र आत्महत्येची स्वप्ने पाहत आहेत.

सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशनिंग) आणि महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा) तसेच शेतीसाठी असलेल्या अनेक सबसिडींच्या योजनांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे, हे जगजाहीर आहे. १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर सबसिडीचे प्रमाण कमी करावे असे बंधन गॅट करारानुसार व आता डब्ल्यूटीओच्या अटींनुसार घालण्यात आलेले आहे. अशावेळी सर्व युरोपीय आणि अमेरिका या राष्ट्रांत शेतकऱ्यांना ३५ ते १२०% पर्यंत सबसिडी दिली जाते. भारतीय शेतकऱ्यांना मात्र त्यांनी १ रुपया गुंतवणूक केली तर, फक्त सोळा पैसेच मिळतात, म्हणजे उणे सबसिडी आहे, असे शेतकरी संघटनेने दाखवून दिले. प्रणव मुखर्जींनी गॅट करारावर सह्या करताना हे लेखी स्वरुपात मान्य केले.

भारतीय शेतकऱ्यांना सबसिडी दिली जात नाही. हे सरकारनेही मान्य केले. असे असताना पुन्हा अन्नसुरक्षा विधेयकासारखे विधेयक आणून सरकारने शेतकऱ्यांवरील बोजा आणखी वाढवला आहे. हा बोजा त्यांना पेलण्यापलीकडचा आहे. गेल्या वर्षभरापासून महागाई वाढते आहे अशी ओरड सर्व थरांतून होत आहे. ही महागाई वाढण्यात अन्नधान्य आणि इतर शेती उत्पादने यांची भाववाढ हेच मोठे कारण असल्याचे वारंवार सरकारकडून सांगितले जाते. एका बाजूला विक्रमी धान्य उत्पादन आणि दुसऱ्या बाजूला देशातील २०% लोक अर्धपोटी... धान्य गोदामांमध्ये सडत आहे... अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. असे हे विचित्र त्रांगडे निर्माण होण्याचे कारण काय? याचा शोध मात्र सरकार कोणताही पक्ष किंवा कृषिमंत्रीही घ्यायला तयार नाहीत. उलट मरणाऱ्याचा गळफास



अधिक आवळण्याचेच हे कारस्थान आहे.

बाजारात किमान दहा रुपये किलो गहू आणि बारा रुपये किलो तांदूळ मिळतो. तेच अन्नधान्य २ रुपये आणि ३ रुपये किलो दराने रेशनवर मुबलक प्रमाणात मिळू लागले तर, अन्नधान्याच्या किमती काय राहतील? शेतकऱ्यांना त्यांच्या अन्नधान्याचे भाव काय मिळतील? याचा विचार कायदे करणाऱ्यांनी करायला हवा. या योजनेअंतर्गत सुरुवातीला ८०% जनतेला वरील भावाने अन्नधान्य पुरवून अन्नसुरक्षा देण्याची स्वप्नवत योजना होती. त्यावर टीका होऊन आता ती सरासरी ६३ टक्क्यांपर्यंत आली आहे. देशात शेतीवर अवलंबून असलेल्या जनतेची संख्या ६३ ते ६५ टक्के आहे. तेच धान्य पिकवणार आहेत आणि त्यांनाच ही नव्वद कोटींची सबसिडी देऊन कमी दराने धान्य देण्यात येणार आहे. याचा अर्थ त्यांनी पिकवलेल्या मालाचा भाव पाडून सरकारकडे कराच्या रुपाने जमा झालेला पैसा सबसिडीच्या रुपाने या योजनेत ओतायचा आणि शेतीमालाचे भाव पाडायचे. हे एकमेव उद्दीष्ट आहे. इतके दिवस शेतकऱ्यांना आपल्या मालाचे भाव का पडतात हे कळत नव्हते. २० वर्षांच्या प्रबोधनानंतर त्यांना शेतीमालाचे भाव आयात निर्यातीवरही अवलंबून असतात हे समजले. आयात निर्यातीची बंधने काढून टाकावीत. आम्हाला जे जगाच्या बाजारपेठेत विकता येईल ते विकू द्यावे, असे शेतकरी आता म्हणत आहेत. कापूस, कांदा, साखर यांच्या निर्यातबंदीसाठी तर सध्याच लढा चालू आहे. अजून शेतकऱ्यांना स्वस्त धान्याचे मात्र थोडे आकर्षण आहे. तो आपलाच माल आहे आणि तोच आपल्याला मातीमोल भावाने दिला जाणार आहे. देशांतर्गत बाजारपेठेत शेतीमालाचे भाव पाडण्याचा हा मार्ग आहे. हे शेतकऱ्यांना लवकरच उमगेल. सध्यातरी अन्नधान्याचे चढे भाव, त्यामुळे उपासमारी, उपासमारीमुळे सबसिडी, सरकारचा पैसा सबसिडीत अडकल्यामुळे अधिक भाववाढ हे दुष्ट चक्र चालू आहे. त्याचाच फायदा सरकार घेत आहे. जेव्हा लोकांच्या हे लक्षात येईल, तेव्हा मात्र शेतकरीच त्याला विरोध करतील आणि ही वेळ दूर नाही.

रिझर्व्ह बँकेने भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वारंवार व्याजदर वाढवण्याची उपाययोजना केली आहे. या उपाययोजनेमुळे कर्जवितरणावर परिणाम होऊन बाजारातील चलनाचा पुरवठा कमी झाला आहे. त्याचाच परिणाम म्हणून औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे. जागतिक मंदीमुळे निर्यातीलाही मर्यादा पडल्या आहेत. साखर, कापूस, कांदा वगैरे शेती उत्पादनांवरती सरकारने निर्यातबंदी लावल्यामुळे आणि जागतिक बाजारपेठेत कापसाची आणि साखरेची मुबलकता असल्यामुळे तसेच आपण उशिरा जागतिक बाजारपेठेत उतरल्याने त्यांनाही जागतिक बाजारपेठेत उठाव नाही. अशा औद्योगिक आणि कृषिमालाच्या निर्यातीच्या मंदीच्या काळातच सोनिया गांधींना हे सर्व गरिबांना घास भरवण्याचे स्वप्न पडले आहे. त्याचा परिणाम येत्या काळातच कृषि उत्पादनांवर होणार असून या योजनेसाठी लागणारे एवढे धान्य कोठून आणायचे हा प्रश्न शिल्लक राहणार आहे. शेतीमालाचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील गडगडलेले भाव आणि देशांतर्गत बाजारपेठेत भाव पाडण्याचे ९० हजार कोटी रुपये खर्च करून केलेले कारस्थान याचे परिणाम शेतकऱ्यांना आपण काही पिकवावे, उत्पादन वाढ करावी अशी ऊर्मी देणारे नाहीत. त्यांना उलट आत्महत्येकडे ढकलणारे हे विधेयक ठरणार आहे!

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# लोकपाल नव्हे अण्णापाल



सुधाकर जाधव

**देशातील लोकशाहीच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण करणाऱ्या निराशाजनक वर्षाचा शेवट मात्र आशादायी होतो आहे. जबरदस्त लोक समर्थनामुळे आम्ही म्हणतो तेच खरे आणि तसेच घडले पाहिजे त्यावर चर्चा नाही अशा टीम अण्णाच्या वाढत्या अरेरावीला लोकांनीच आळा घातल्याचे अद्‌भूत दृश्य वर्षाच्या शेवटी पाहायला मिळाले. लोकांनी पाठ फिरविल्याने अण्णांना व त्यांच्या महत्त्वाकांक्षी सहकाऱ्यांना मुंबई आंदोलन व पुढची झुंडीची आंदोलने गुंडाळावी लागल्याने लोकशाहीला लागलेले ग्रहण दूर होण्याचे संकेत त्यातून मिळाले आहेत. अण्णा आंदोलनालाच लोकशाहीच्या वाटेवर आणण्याची किमया सर्वसामान्य जनतेने केली आहे. अण्णांनी झुंडशाहीला विराम देऊन मतदार जागृतीचा केलेला संकल्प म्हणजे सर्वसामान्य जनतेने देशाला दिलेली नववर्षाची अनमोल भेट आहे!**

लोकसभेत लोकपाल आणि लोकायुक्त विधेयक संमत होण्याचा दिवस हा अनेक अर्थांनी महत्त्वाचा मानला जाणार आहे. लोकपाल विधेयक पारित करण्याची ही लोकसभेची पाहिली वेळ नाही आहे. ४० वर्षे काय झोपले होता का? अशी हातघाईवर येऊन विचारणा करणाऱ्यांना जन रेट्यामुळे नव्हे तर सरकारनेच नियुक्त केलेल्या प्रशासकीय आयोगाच्या शिफारसी वरून एकदा असे विधेयक पारित झाले होते याची कल्पनाच नसते. ते पारित विधेयक राज्यसभेत मंजूर होण्याआधीच लोकसभेचा कार्यकाळ संपल्याने कायद्यात रूपांतरीत होऊ शकले नव्हते; पण तेव्हाची परिस्थिती व आजची परिस्थिती यात पुष्कळ फरक आहे. आजच्या विधेयकामागे जनरेटा कारणीभूत आहे. जनतेच्या मागणीचा राज्यकर्त्यांनी सन्मान करणे लोकशाहीत अपेक्षित आणि अपरिहार्य असते; पण ज्या घाईने आणि घायकुतीला येऊन सरकारने लोकशाहीचा महत्त्वाचा आधार असलेल्या कार्यपालिकेवर, देशातील प्रशासनिक व्यवस्थेवर व्यापक परिणाम करणारे हे विधेयक पारित करून घेतले ती सरकारची अगतिकता प्रकट करणारी आहे आणि ज्या लोकसभेने एवढ्या घाईने हे विधेयक पारित करू दिले त्या लोकसभेनेसुद्धा स्वतःच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करून आपण सरकारपेक्षा कमी अगतिक नसल्याचे दाखवून दिले. लोक अगतिक असणे हे लोकशाहीला जितके मारक असते तितकेच मारक लोकशाही संस्थांनी अगतिक होणेसुद्धा असते. या बिलावरील चर्चेतील सर्व विवेकी आवाज न ऐकण्याचा निर्धारयुक्त अविवेक सरकार आणि सरकार पक्षाने दाखविला यापेक्षा वेगळा निष्कर्ष या विधेयकावरील दिवसभराची चर्चा आणि या चर्चेचे मध्यरात्रीच्या सुमारास निघालेले फलित पाहून काढता येणार नाही. रस्त्यावर जे आंदोलनासाठी उतरतात त्यांची अधीरता आक्षेपार्ह नसते, स्वाभाविक असते. भावनेने भारल्याशिवाय व भारावल्याशिवाय आंदोलने होत नसतात. अशाच भावनेच्या प्रचंड वाफेवर लोकपालच्या प्रश्नावर अण्णा आंदोलनाची गाडी सुसाट धावली. ही आंदोलनाची गाडी अशीच सुसाट धावत राहिली तर मोठमोठे अपघात घडले असते आणि म्हणून अण्णा इंजिनातील मागणीची वाफ काढून घेण्याचा सरकारचा व लोकसभेचा निर्णय चुकीचा म्हणता येणार नाही; पण आंदोलनाची वाफ कोणाला कोठलीही इजा होणार नाही अशा पद्धतीने सोडण्याऐवजी सरकारने ती वाफ स्वतःच्या इंजिनात भरून ते सरळ संसदेवर धडकाविले आणि लोकसभेने स्पीडब्रेकर न लावता हे इंजिन थडकू देऊन स्वतःलाच अपंग करून घेतले आहे. कोणत्याही आंदोलनामागची भावना समजून घेणे, त्या भावनेची दखल घेऊन उचित कृती करणे हे लोकशाही व्यवस्थेत सरकार आणि संसदेचे कर्तव्यच असते. जेथे लोकशाही नसते तेथे आंदोलने गोळ्या घालून चिरडून टाकली जातात, पण लोकशाही व्यवस्थेत लोकभावनांची दखल घेऊन त्या भावनांवर हळुवार फुंकर मारून ती भावना शमवायची असते. त्या भावनेत सरकार आणि संसदेने स्वतःला वाहवून घेणे अजिबात अपेक्षित नसते; पण सरकार व लोकसभेने कर्तव्यच्युत होऊन लोकपाल भावनेत स्वतःला वाहवून घेतले असेच पारित झालेले विधेयक दर्शविते. गंमत म्हणजे लोकसभेत सरकार आंदोलकाची भाषा बोलत होते! विधेयक मांडल्यावर चार लोकांची त्यावरील भाषणे ऐकून त्यात तब्बल १० दुरुस्त्या करायला सरकार जेव्हा पटकन तयार होते तेव्हा सरकारने हे विधेयक फार विचारपूर्वक मांडले नाही हे सिद्ध होते. एवढी घाई का करीत आहात असे जेव्हा काही सदस्यांनी व पक्षांनी सरकारला संसदेत विचारले तेव्हा सरकारच्या वतीने अगदी आंदोलकाच्या भाषेत उत्तर दिल्या गेले की देश ४० वर्षांपासून या विधेयकाची प्रतीक्षा करीत आहे. आणखी किती प्रतीक्षा करायला लावणार! रामलीला मैदानात असेच बोलून अण्णा हजारेंनी सरकार व संसदेची कोंडी करून तात्काळ लोकपाल विधेयक संमत करण्याचा आग्रह धरला होता. अगदी त्याच भाषेत तसाच आग्रह सरकारने धरून हे विधेयक पारित करून घेतले आहे. संसदेत अण्णा आणि त्यांची टीम नव्हती; पण लोकसभेतील सरकारचे वर्तन हे अण्णा आणि त्यांच्या टीमचे भूत सरकारच्या मानगुटीवर बसल्याचे व त्या भुताने झपाटल्यागत सरकार वागत असल्याचे दर्शविणारे होते. असे नसते तर सरकारने लोकशाही संस्थांचे श्रेष्ठत्व अबाधित राखून लोकशाही संस्थाना जबाबदार राहून भ्रष्टाचार संपविण्यासाठी सशक्त असे लोकपाल बिल मांडले असते; पण सरकारचा सगळा विचार आणि प्रयत्न हा भ्रष्टाचार संपविणारा कठोर कायदा आणण्यावर केंद्रित असण्याऐवजी अण्णा आणि त्यांच्या टीमच्या जास्तीत जास्त मागण्या कशा पूर्ण करता येतील व त्यांना कसे खुश करता येईल यावरच होता हे सरकारचे वर्तन दर्शवित होते. अण्णा आणि त्यांच्या मंडळींपुढे सपशेल शरणागती सरकारने पत्करली असे बिलातील महत्त्वाच्या तरतुदींवरून दिसून येईल.



देशाच्या संघात्मक रचनेवर विपरीत परिणाम करणाऱ्या आणि देशाच्या निवडून दिलेल्या सर्वोच्च कार्यकारी प्रमुखाच्या पायात बेड्या घालणाऱ्या तरतुदी बदलण्यासाठी संसदेत पुरेसा आणि मुखर असा पाठींबा असतानाही सरकार त्यात बदल करायला धजावले नाही याचे कारण सरकार अण्णा आंदोलनाच्या दहशतीत होते हेच आहे. लोकभावनेचा आदर करून केलेला कायदा आणि लोकांच्या दहशती पोटी केलेला कायदा यातील फरक आणि अंतर हे लोकशाही व हुकूमशाहीतील फरका सारखेच असते हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

## अवाजवी मागण्यांपुढे सरकार झुकले

जसे ४० वर्ष झाले तरी बिल नाही हे अण्णा आंदोलनाचे तुणतुणे सरकारने लोकसभेत वाजविले तसेच रामलिला आंदोलनाचे वेळी लोकसभेत कधीच पारित न झालेल्या ठरावाच्या बाबतीत सरकारनेसुद्धा टीम अण्णासारखाच कांगावा केला. अण्णांनी उपस्थित केलेल्या तीन मुद्द्यांशी संसद तत्त्वतः सहमत आहे व या तिन्ही मुद्द्यांचा कसा समावेश करता येईल याचा विचार करण्याचे निर्देश संसदेच्या स्थायी समितीला देण्याची घोषणा सभागृहाच्या वतीने प्रणव मुखर्जी यांनी केली होती. लोकपाल बिलात समावेश करण्याचे आश्वासन कधीच देण्यात आले नव्हते; पण अण्णा टीमसारखेच प्रणव मुखर्जी यांनीसुद्धा अण्णांना दिलेल्या वचनाचा कसा भंग करता येईल असा पवित्रा घेऊन लोकसभेनेच राज्यासाठी लोकआयुक्त बनविणारा कायदा पुढे रेटला. राज्यांच्या स्वायत्ततेवर हा सरळ घाला होता. संघराज्याच्या रचनेला धक्का देणारी ही तरतूद बदलण्यासाठी काँग्रेस वगळता सर्व पक्ष आग्रही होते; पण सातत्याने अण्णा आंदोलनाच्या दडपणाखाली वावरणाऱ्या व निर्णय घेणाऱ्या सरकारने अण्णा आंदोलनाचा रोष ओढवून घेण्यापेक्षा संघराज्याच्या रचनेवर आघात करणे सरकारने पसंत केले. ज्या ठरावाचा अण्णा टीम आणि प्रणव मुखर्जी वारंवार उल्लेख करतात त्या वेळी झालेल्या चर्चेत सर्वच प्रादेशिक पक्षांनी हीच भूमिका ठामपणे मांडली होती आणि त्यावरून सभागृहाचे काय मत होते हे आपल्या लक्षात येईल. सरकारने मात्र अण्णा आणि त्यांच्या टीमच्या भावनांना गोंजारून लोकसभेच्या भावनेचा अवमान केला. सरकारने असाच प्रकार पंतप्रधानांना लोकपालच्या कक्षेत आणण्याच्या बाबतीत केला. पंतप्रधानांवर वेगळ्या कारणासाठी नाराज असलेले डावे व भाजप वगळता बहुतेक पक्षांनी पंतप्रधान पद लोकपालच्या कक्षेत आणण्यास विरोध केला होता आणि विरोध करणारे कोणीही सहजासहजी पंतप्रधान पदावर पोचतील असे नव्हते. निवडणुकीने भरले जाणारे संसदीय लोकशाहीतील सर्वोच्च पदावरील व्यक्ती नियुक्त प्रतिनिधीच्या कक्षेत असता कामा नये हा लोकशाहीची बूज राखणारा विचार त्यामागे होता. पंतप्रधानपदाचे महत्त्व आणि त्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करून अस्थिरता निर्माण करणे सहज शक्य असते हे लक्षात घेऊन सरकारनेच देश हिताखातर पंतप्रधानांना लोकपालच्या कक्षेत न आणण्याबाबत ठाम राहायला हवे होते. पंतप्रधान हा संसदेला जबाबदार असतो म्हणजेच लोकांना जबाबदार असतो. कोणताही नामनियुक्त व्यक्ती संसदेपेक्षा मोठा असू शकत नाही. पंतप्रधानावर संसदेचे नियंत्रण पुरेसे नाही असे म्हणणे व मानणे हा संसदेचा अपमान आहे आणि असा अपमान करण्यास अण्णा आंदोलना इतकेच सरकारही जबाबदार आहे. संसद हा अपमान मूग गिळून

सहन करते हीच संसदेने संसदेच्या सार्वभौमत्वाबद्दल केलेली तडजोड ठरते. सरकारात नसलेले पक्ष या बाबतीत आग्रही होते; पण अण्णा आंदोलनाचा पक्षाघात सरकारला झाल्याने सरकार देशहिताचा निर्णय घेऊ शकले नाही हेच खरे. सीबीआयच्या बाबतीतसुद्धा सरकारची भूमिका लेचीपेचीच राहिली आहे. कोणत्याही पोलिसी संस्थांवर जर लोकनियुक्त सरकारचे नियंत्रण नसेल तर ते पोलिसी संस्थांच्या मनमानीला व जुलमाला निमंत्रण ठरते. सीबीआयसारख्या संस्थांचा सत्तेत असणारे दुरुपयोग करतात हे सत्य आहे. जे लोक असा दुरुपयोग करतात त्यांना बदलण्याचा अधिकार लोकशाही व्यवस्थेत लोकांना आहे. ज्या दिवशी लोक हा अधिकार वापरतील त्या दिवशी हा दुरुपयोग कमी होईल. लोकांनी आपला अधिकार योग्य रीतीने वापरला पाहिजे यासाठी प्रयत्न न करता एक दुरुपयोग करतो म्हणून ती संस्था दुसऱ्याच्या ताब्यात दिल्याने दुरुपयोग कसा टळेल? लोकप्रतिनिधी आणि लोकनियुक्त सरकारच्या अधिकाराला कात्री लावून नियुक्तांच्या हाती अधिकार देण्याचा लोकशाहीविरोधी प्रवाह स्वागतार्ह कसा असू शकतो? पुढे असा आग्रह धरला जाईल, की सरकार पोलिसांचा दुरुपयोग करते. पोलिसांना द्या दुसऱ्याच्या ताब्यात. सरकार सैन्याचा दुरुपयोग करते द्या सैन्य दुसऱ्याच्या ताब्यात अशा मागण्यांना अंतच राहणार नाही. लोकपालसारख्या संस्था सशक्त करा त्यांना भरपूर अधिकार द्या आणि अशा नियुक्तांना नियुक्त करण्याचा अधिकार मात्र निवडून आलेल्या प्रतिनिधींना असता काम नये आणि निवडून आलेल्या लोकांना तो जबाबदार असता काम नये अशा प्रकारच्या नव्या नियुक्तशाहीचे प्रेम अण्णा आंदोलन पसरवीत आहे आणि सरकार शरणागती पत्करून व स्वतःच्या अधिकारावर पाणी सोडून नवा नियुक्तवाद प्रतिष्ठीत करीत आहे. लोकपाल बिल हे त्या दिशेने पडलेले पहिले; पण मोठे पाऊल आहे. परिणामांचं भान नसणारेच आंदोलन करू शकतात; पण सरकारने मात्र नेहमीच परिणामाचे भान ठेवून निर्णय घेणे अपेक्षित व अभिप्रेत असते; पण सरकारने परिणामाचे भान न ठेवता अण्णा आंदोलनाचे लांगुलचालन करण्याखातर लोकपाल बिलात घातक तरतुदींचा समावेश केला आहे. संसद जी संस्था निर्माण करीत आहे ती संस्था संसदेला जबाबदार असलीच पाहिजे आणि तशी ती राहील हे बघणे सरकार व संसदेचे काम होते; पण दोघांनीही आपल्या कर्तव्यात कसूर करून लोकपालला भस्मासुराची ताकद दिली आहे.

### लोकपाल कोणाला जबाबदार असणार आहे?

विधेयकात लोकपाल नियुक्तीची व लोकपालला काढून टाकण्यासंबंधीची तरतूद आहे; पण नियुक्ती आणि निवृत्ती किंवा बरखास्ती दरम्यान तो कोणालाच जबाबदार असणार नाही! त्याच्या कामाची समीक्षा करण्याचा अधिकार आणि चुका दुरुस्त करा म्हणून सांगण्याचा अधिकार कोणालाच नाही! एकप्रकारे मनमानीचा सर्वाधिकार सरकारने या कायद्याद्वारे लोकपालला बहाल केला आहे. फक्त कोणी कोणाविरुद्ध तक्रार केल्याशिवाय लोकपालला मनमानी करता येणार नाही ही सरकारने या विधेयकात टाकलेली माफक अट अण्णा कंपनीला फारच जाचक वाटते आहे. खरे तर अण्णा आणि कंपनी ज्या उत्तराखंड लोकआयुक्त कायद्याला सर्वाधिक आदर्श कायदा मानीत आहे त्या विधेयकात अशा जबाबदारीची चांगली तरतूद आहे. विधिमंडळ समिती तेथील लोकआयुक्त कार्याची समीक्षा करणार आहे. विधिमंडळाने नियुक्त केलेल्या समितीला लोकायुक्त जबाबदार राहणार असल्याने मनमानीवर आपोआप आळा बसणार आहे. त्याच धर्तीवर लोकपाल कायद्यात लोकपालला संसदेस जबाबदार ठरविता आले असते; पण संसद सदस्य चोर आहेत, गुंड आहेत आणि भ्रष्ट आहेत हा आपला आवडता राग अण्णा सतत आळवीत असल्याने उत्तराखंडच्या 'आदर्श' कायद्यात जी तरतूद आहे ती लोकपाल कायद्यात ठेवण्यास टीमअण्णाचा विरोध असल्याने तशी तरतूद करण्याची हिंमतसुद्धा मनमोहन सरकारला झाली नाही. जगाच्या पाठीवर जवळपास ८० देशात लोकपाल संस्था कार्यरत आहे आणि प्रत्येक ठिकाणी याची नियुक्ती तेथील संसदच करते आणि प्रत्येक देशात लोकपालला आपला अहवाल संसदेलाच सादर करावा लागतो. प्रत्येक ठिकाणी चौकशी करून कारवाईची शिफारस करणारा अहवाल देणे- ज्याला अरविंद केजरीवाल पोस्टमन म्हणतात- हेच त्याचे काम असते; पण आपल्या येथे मात्र अगदी जगावेगळा सर्वाधिकार संपन्न लोकपालसाठी थयथयाट सुरू आहे आणि अशा थयथयाटापुढे सरकार झुकत आहे. मदारी जसा बंदराला आपल्या तालावर नाचवितो तसे सरकार लोकसभेत अण्णा आंदोलनाच्या तालावर नाचत असल्याचे दृश्य दिसत होते. सरकारचे हे सगळे लांगुलचालन आणि टीमअण्णा पुढे लोटांगण अतिशय क्षुद्र हेतूने सुरू आहे. येत्या उत्तरप्रदेशातील निवडणुकीत काँग्रेसच्या युवराजला अण्णा आणि टीमचा त्रास होऊ नये हा सरकार व त्याच्या पक्षाचा हेतू आहे. युवराज राहूल गांधीचा राज्यभिषेक बराचसा उत्तर प्रदेशातील निवडणुकीवर अवलंबून असल्याने स्वतःचे व लोकशाही संस्थांचे अवमूल्यन व मानहानी करण्याला सरकारने मागेपुढे पाहिले नाही. आपण अण्णांच्या कल्पनेपेक्षाही भारी लोकपाल निर्माण केला हे दाखवून देण्याचे युवराज राहुलचे स्वप्न सरकारच्या गलथानपणामुळे संविधान दुरुस्ती न झाल्याने भंगले एवढेच वाईटातून चांगले घडले आहे. असे घडले नसते तर लोकपालरूपी भस्मासुराला ध्रुवाचे अढळपद प्राप्त झाले असते; पण अण्णाच्या खांद्यावर बंदूक ठेवून जे लोकशाहीवर निशाणा ठेवून आहेत ते लोकशाहीच्या अशा छोट्या मोठ्या मोडतोडीने खुश होणार नाहीत हे उघड आहे. अण्णांची ताजी काँग्रेसविरोधी भूमिका पाहता सरकारचा सगळा खटाटोप वाया जाण्याची शक्यताच अधिक आहे. सरकार आणि काँग्रेस पक्षाला गाढव गेले आणि ब्रम्हचर्यही गेले या म्हणीचा प्रत्यय येण्याची शक्यता अधिक आहे. सरकारने देशाला लोकपाल ऐवजी अण्णापाल देवून त्याच्यावरील अण्णा आंदोलनाची दहशत कमी झाली नसल्याचे दाखवून दिले ही चिंतेची बाब असली तरी जनसामान्याचा अण्णा ज्वर उतरणे ही लोकशाही स्वास्थ्यासाठी चांगले लक्षण आहे. देशातील लोकशाहीच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण करणाऱ्या निराशाजनक वर्षाचा शेवट मात्र आशादायी होतो आहे. अण्णा आंदोलनाला आळा घालण्यात भल्याभल्यांना अपयश आले असताना सर्वसामान्य जनतेने मात्र चमत्कार घडविला. जबरदस्त लोक समर्थनामुळे आम्ही म्हणतो तेच खरे आणि तसेच घडले पाहिजे त्यावर चर्चा नाही अशा टीम अण्णाच्या वाढत्या अरेरावीला लोकांनीच आळा घातल्याचे अद्भूत दृश्य वर्षाच्या शेवटी पाहायला मिळाले. लोकांनी पाठ फिरविल्याने अण्णांना व त्यांच्या महत्त्वाकांक्षी सहकाऱ्यांनी मुंबई आंदोलन व पुढची झुंडीची आंदोलने गुंडाळावी लागल्याने लोकशाहीला लागलेले ग्रहण दूर होण्याचे संकेत त्यातून मिळाले आहेत. अण्णा आंदोलनालाच लोकशाहीच्या वाटेवर आणण्याची किमया सर्वसामान्य जनतेने केली आहे. अण्णांनी झुंडशाहीला विराम देऊन मतदार जागृतीचा केलेला संकल्प म्हणजे सर्वसामान्य जनतेने देशाला दिलेली नववर्षाची अनमोल भेट आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# उदंड जाहली पॅकेजेस



गिरधर पाटील

**खरे म्हणजे अशी पॅकेजेस देऊन शेतकऱ्यांसाठी काहीतरी केल्याचे जे वातावरण तयार केले जाते त्यातून पक्षीय राजकारणाला पूरक ठरणाऱ्या निवडणुका वा तत्सम तात्कालिक लाभ वगळता शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच येते. वास्तवात शेती तोट्यात असल्याने या क्षेत्रातील भांडवलीय ऱ्हास व त्याची पुनर्भरपाई या दिशेने विचार होताना दिसत नाही. शेतमाल बाजाराच्या दुर्दशेबाबतही फारसे बोलले जात नाही. एरवी आंतरराष्ट्रीय व देशांर्तगत बाजारात मिळू शकणाऱ्या भावातील नफ्याचा भाग शेतकऱ्यांपर्यंत वळवण्याचा प्रयत्न, जो या शेतमाल बाजारातील सुधारांमुळेच शक्य आहे, त्याचाही विचार होताना दिसत नाही.**

हो ना करता शेवटी राज्य सरकारने कापूस, सोयाबीन व धान उत्पादकांना पॅकेज जाहीर केले. प्राप्त परिस्थितीत दुसरे काही करता येत नसल्याने कुठेतरी हा विषय संपवण्याच्या दृष्टीने हा निर्णय झाल्याचे दिसते. यातून हायसे होत सरकार सुटकेचा निश्वास टाकतानाच कांदा उत्पादकांनीही अशा मदतीसाठी हाळी ठोकली. काय करणार शेतीचा सारा धंदाच मुळात तोट्याचा असल्याने पिकांच्या विगतवारीनुसार मदत द्यायची तर अशी अनेक पिके आपली वाट पाहत रांगेत उभी असल्याचे दिसेल.

शेतकऱ्यांच्या रास्त भाव न मिळण्याच्या आक्रोशावर पॅकेजेसची मलमपट्टी राजकीयदृष्ट्या सहजसुलभ असली तरी त्यावरच्या कायमस्वरूपी उपायांचा विचार ना सरकार करते आहे ना विरोधक! विरोधकांना तर केवळ एंट्री-एक्झीट करीत आपली भूमिका पार पाडायची आहे. सरकार व विरोधक शेतकऱ्यांना या व्यवस्थेतील हकदारापेक्षा मतदार म्हणून अधिकतेने पाहत असल्यानेच निवडणुका समोर ठेवूनच सारे प्रश्न हाताळले जात आहेत. अशा कोंडीतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात सरकारने आजवर दिलेल्या शेतकऱ्यांच्या व इतरही पॅकेजेसचा अनुभव फारसा समाधानकारक नाही. पंतप्रधान पॅकेज तसे अनेक अर्थांनी गाजले. त्यातल्या गैरप्रकारांची चौकशी आजवर चालूच आहे. संपूर्ण कृषिखाते संशयाच्या भोवऱ्यात सापडूनदेखील त्यातून काही निघू शकले नाही. हे पॅकेज नेमके कुठे गेले याचा थांगपत्ता अजून लागलेला नाही, मात्र हे पॅकेज मिळाले म्हणून शेतकऱ्यांचा दरवर्षीचा कित्येक पटीने मिळणारा कापसाचा बोनस बंद झाला, त्याचबरोबर त्या भागावरील राज्याच्या विकास निधीतही काटछाट करण्यात आली. यातून निर्माण झालेल्या सिंचनक्षमतांचा फायदा कृषिपेक्षा औद्योगिक क्षेत्रासाठीच करण्यात आला. मुळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवणे हा मूळ उद्देश असलेले पॅकेज सरकारच्या दाव्यानुसार दिले गेल्याचे मानले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या मात्र आटोक्यात न येता वाढत्याच राहिल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

बऱ्याचदा अशी पॅकेजेस ही आकड्यांची चलाखी असते. यातून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने, सर्वसामान्यांच्या डोळ्यात धूळफेक, विरोधकांचे लटके समाधान व त्या भागातल्या पुढारी-प्रशासनाची चांदी असा हा सारा मामला असतो. मागच्या निवडणुकांपूर्वी उत्तर महाराष्ट्र व कोकण विभागाला करोडोंच्या मोठमोठ्या रकमांची अशीच वाजतगाजत मंत्रिमंडळाच्या बैठका घेत पॅकेजेस जाहीर करण्यात आली होती. निवडणुका झाल्यावर लक्षात आले की त्या भागातील नियोजित खर्चाच्याच रकमा या पॅकेजेसमध्ये धरल्या होत्या व त्याही निधीच्या पळवापळवीत कुठे गायब झाल्या हेच कळाले नाही. या साऱ्या पार्श्वभूमीवर हे पॅकेज जर पारखले तर अनेक शंका उभ्या राहतात व तांत्रिक घोळातच हे पॅकेज विरून जाते की काय अशी भीतीही वाटते.

मुळात या व अशा पॅकेजेसची अंदाजपत्रकीय तरतूद नसते. नियोजनबाह्य खर्चासाठी दोन दिवसांपूर्वीच विधानसभेत पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. त्यातही या खर्चाचा उल्लेख नाही. वाढता प्रशासकीय खर्च व कर्जावरचे व्याज जाऊन शिल्लक राहिलेल्या विकास निधीवर १५ टक्के कपातीचा मार्ग सुचवला गेला आहे. आमदारांच्या विकास निधीवरही डोळा आहे. आघाडीच्या सरकारमधील विविध मंत्री आपापल्या खात्याच्या विकास योजनांना कितपत कात्री लावू देतात याची शंका आहे. कारण या योजना सुरू होऊन त्यावरचा सुमारे ४० टक्के खर्च होऊनही गेला आहे. नवीन कर वा वाढ याबाबतचा रोजगार हमी योजना व व्यवसाय कराचा अनुभव ताजा आहे. एकंदरीत अशा अव्यापारेषु व्यापाराला नियोजन मंडळाची परवानगी व त्यामुळे अपुऱ्या राहिलेल्या योजनांचा केंद्राचा राहिलेला निधी मिळण्यातील अडचणी यांचा प्रामुख्याने विचार करावा लागणार आहे. शिवाय ही १५ टक्क्यांची कपात ग्रामीण भागातील विकास योजनांना, प्रामुख्याने सिंचनासारख्या प्रकल्पांनाही लागू असल्याने काय मिळवले व काय गमावले याचा हिशेब नक्कीच करावा लागणार आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे निधी वाटपाचा. दर हेक्टरी मदत जाहीर करताना एका शेतकऱ्याला कमाल किती मदत? तो जर कापूस उत्पादक असेल तर किती? सोयाबीन व धान उत्पादक असेल तर किती? शिवाय वेगवेगळ्या भागातील आणेवारीचा, पंचनाम्यांचा चांगला घोळ घालता येऊ शकतो. यासारखे मुद्दे एखाद्याने न्यायालयात नेऊन विषमता व भेदभावाच्या मुद्यावर दाद मागितली तर सरकारसाठी सोईचेच ठरणार आहे. शेवटी आम्ही तर द्यायला तयार होतो, न्यायालयीन अडचणीमुळेच देता येत नाही अशी भूमिका सरकार घेण्याची दाट शक्यता आहे.

खरे म्हणजे अशी पॅकेजेस देऊन शेतकऱ्यांसाठी काहीतरी केल्याचे जे वातावरण तयार केले जाते त्यातून पक्षीय राजकारणाला पूरक ठरणाऱ्या निवडणुका वा तत्सम तात्कालिक लाभ वगळता शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच येते. वास्तवात शेती तोट्यात असल्याने या क्षेत्रातील भांडवलीय ऱ्हास व त्याची पुनर्भरपाई या दिशेने विचार होताना दिसत नाही. शेतमाल बाजाराच्या दुर्दशेबाबतही फारसे बोलले जात नाही. एरवी आंतरराष्ट्रीय व देशांर्तगत बाजारात मिळू शकणाऱ्या भावातील नफ्याचा भाग शेतकऱ्यांपर्यंत वळवण्याचा प्रयत्न, जो या शेतमाल बाजारातील सुधारांमुळेच शक्य आहे, त्याचाही विचार होताना दिसत नाही.

वास्तवात किरकोळ व्यापार क्षेत्रात येणारी परकीय भांडवलीय गुंतवणूक या क्षेत्रासाठी अपूर्व अशी संधी होती. संरचनांच्या अभावामुळे होणारे काढणीपश्चात नुकसान व वितरण-साठवणुकीच्या व्यवस्थांची दूरवस्था यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन व गुणवत्ता वाढून त्याला दोन पैसे मिळू शकले असते. आजच्या सरकारांच्या कर्जबाजारी आर्थिक अवस्था लक्षात घेता सरकार अशा गुंतवणुकी करू शकेल हे संभवत नाही व आलेली परकीय गुंतवणूकही आपण राजकीय विचार करूनच अव्हेरत आहोत याचाही कुठल्या पातळीवर गंभीरतेने विचार होताना दिसत नाही.

ज्या देशात महागाईचा मुद्दा ऐरणीवर आला आहे, त्याच देशात शेतकऱ्यांना किमान उत्पादनखर्चाइतकाही भाव मिळत नाही, हा भाव मिळत नसल्याने शेतकरी शेतमाल रस्त्यावर फेकताहेत असे विरोधाभासी चित्र दिसते. ज्या देशात कुपोषण व भूकबळींचे प्रमाण गंभीर असूनदेखील सरकारी गोदामात खाद्यान्न सडत पडते, ज्या देशाची ६५ टक्के लोकसंख्या ज्या क्षेत्रावर अवलंबून आहे त्या क्षेत्राकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन असा असल्यावर वेगळे तरी काय घडणार?

**डॉ. गिरधर पाटील**
http://girdhar-liberals.blogspot.com
girdhar.patil@gmail.com

■■

# विकासाची नवी दृष्टी स्वीकारणार केव्हा?

**मराठवाड्याच्या विकासाला चालना द्यायची असेल तर सरकारी निर्बंधे दूर करणे हाच त्यावरचा उपाय होऊ शकतो. परंतु या मागणीच्या वाटेने जायला आमचे तथाकथित सरकारी पंडित तयार नाहीत कारण लोक आपला आपण विकास करू लागले तर यांना कोण विचारणार? आमचे लोकप्रतिनिधी तयार होणार नाहीत कारण असे झाले तर त्यांना 'मलीदा' मिळणार नाही. सरकारी अधिकाऱ्यांना तर हे नकोच आहे कारण निर्बंध आहेत म्हणूनच त्यांची वरकमाई आहे. निर्बंध उठल्यावर वरकमाई कोठून मिळणार?**



**अमर हबीब**

१९७५ पूर्वी अशी समजूत होती की, मराठवाड्याला मुख्यमंत्री पद मिळाले नाही म्हणून मराठवाड्याचा विकास होत नाही. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले आणि विकासाचा आणि मुख्यमंत्रीपदाचा काही संबंध नाही हे लक्षात आले. निलंग्याचे शिवाजीराव पाटील, लातूरचे विलासराव देशमुख व त्यांच्या पाठोपाठ शंकरराव चव्हाणांचे पुत्र अशोकराव चव्हाणही मुख्यमंत्री झाले. एकाही मुख्यमंत्र्याने मराठवाड्याचा विकास केला नाही. उलट मराठवाड्याची मान खाली जाईल अशा कारणांनी तिघांना पायउतार व्हावे लागले. मुलीला परीक्षेत गुणवाढ करणे, आतंकी हल्ला कॅश करण्यासाठी चित्रपट निर्मात्याबरोबर ताज हॉटेलला भेट देणे आणि आदर्श घोटाळ्यात सहभागी होणे अशा कारणांनी तिघांची हकालपट्टी झाली. अर्थात आणिबाणीच्या काळात शंकरराव चव्हाणांनी विमानतळावर संजय गांधीची केलेली तथाकथित 'सेवा' देखील मराठवाड्याची मान खाली घालविणारीच होती. चारही मुख्यमंत्र्यांच्या काळात मराठवाड्याचा विकास झाला नाही. आता मराठवाड्याला पद मिळाले नाही म्हणून मराठवाड्याचा विकास झाला नाही असे म्हणण्याचे कोणी धाडस करीत नाही.

विकासासाठी स्वतंत्र पैसा मिळाला की आम्ही आमचा विकास करू, या समजुतीबद्दल अजून पुरेसा भ्रमनिरास झालेला नसला तरी त्या मार्गाबद्दल आता कोणी फारसे आग्रहीही राहिलेले नाही. वैधानिक विकास महामंडळांची मागणी जरी मराठवाडा विकास परिषदेने केली असली तरी त्याबद्दल मराठवाड्यात एकमत नव्हते. १९९४ साली शरद पवार मुख्यमंत्री असताना वैधानिक विकास मंडळांची स्थापना झाली. तिला मराठवाड्याचे तथाकथित शिल्पकार दस्तूरखुद्द माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनीच 'राज्यात फुटीरतेची बिजे पडतील' असे म्हणून विरोध केला होता. वैधानिक मंडळे स्थापनेला आता अठरा वर्षे होऊन गेली. कोठेही फुटीरतेची बिजे पडली नाहीत. मुद्दा फुटीरतेचा नव्हताच. मुद्दा उपयोगितेचा होता. अठरा वर्षात या महामंडळांचा कितपत उपयोग झाला? दुर्दैवाने याचे उत्तरही नकारार्थीच आहे. फुटीरतेची बिजे पडली नाहीत या पेक्षा या वैधानिक मंडळांच्या पुरस्कर्त्यांच्या अपेक्षा सपशेल फोल ठरल्या ही त्याहून जास्त अर्थपूर्ण बाब आहे. या पर्श्वभूमीवर विकास म्हणजे काय आणि तो नेमका होतो कसा? हे समजावून घेणे आवश्यक आहे.




शासकीय समित्यांच्या खुर्च्या उबविणारे सरकारी पंडित आकडेवारीच्या जंजाळात अडकून पडले. दांडेकरांपासून केळकरांपर्यंत हा खेळ अव्याहत सुरू आहे. या विद्वानांनी साध्या सरळ सोप्या गोष्टींकडे लक्ष दिले असते तर प्रश्न कधीचे सुटले असते. एका गावाला जोडणारा रस्ता हवा होता. खर्च येणार होता १० ते १५ लाख रुपये. अख्या गावाची विकासाची मागणी ही एकच होती. रस्ता झालाच पाहिजे. सरपंचांपासून खासदारांपर्यंत सर्व लोकप्रतिनिधींचे उबरठे झिजवून झाले. लोकांनी आंदोलनही केले. गाव थकून गेले. माझ्या असे लक्षात आले की, या गावात कापूस पिकतो. शेकडो एकर कापसाच्या शिवारावर हजारो क्विंटल पिकणारे कापूस मातीमोल विकले जाते. कापूस एकाधिकार योजनेमुळे या शेतकऱ्यांना जागतिक व राष्ट्रीय बाजारभावांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. यांना जर स्पर्धात्मक भाव मिळाला तर हे लोक पट्टी गोळा करून रस्ता बांधू शकतात. अगदी सहज प्रश्न सुटणारा होता परंतु कापूस एकाधिकार खरेदीबद्दल विकासवाले बोलायला तयार नव्हते. मराठवाड्याच्या विकासाला सर्वात मोठा फटका कापूस एकाधिकार आणि उसाच्या झोनबंदीचा बसला. ती नसती तर या भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती कधीची सुधारली असती. तथाकथित अनुशेषाच्या रकमेपेक्षा या दोन योजनांमुळे मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे कितीतरी अधिक नुकसान झाले आहे. विकासवाल्यांनी त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही.

त्यांच्या विकासाची कल्पना मदारीच्या माकडाला सजविणे अशी आहे. रस्ते करा, रेल्वे आणा, पूल बांधा, सिंचन करा, आदी आदी. माकडाला गोंड्यांची टोपी मिळाली, याचे माकडाला कसले कौतुक? याचे कौतुक मदारीला. कारण गोंडा हलला की लोक मदारीला पैसे देणार. त्याची कमाई होणार. माकडाला नेहमीचा चाराच मिळणार. विकासाची ही कल्पना अनैसर्गिक आणि टाकाऊ आहे. विकासाचे एकक कुटुंब असते. कुटुंबाची क्रयशक्ती वाढली की विकासाची वाटचाल सुरू होते. क्रयशक्ती मारणारी धोरणे कायम ठेवून, केलेल्या कोणत्याही संरचनांचा उपयोग तळातील माणसाला होत नाही. म्हणून कुटुंबात येणारा पैसा कोठे थोपविला जात असेल तर तो अडथळा पहिल्यांदा दूर करणे हाच विकास आंदोलनाचा प्रारंभ होऊ शकतो. दुर्दैवाने मराठवाडा विकासाच्या नेत्यांनी या बाबीकडे कायम दुर्लक्ष केले आहे. क्रयशक्ती कमी असणारे लोक जेथे राहतात तेथील शौचकूपे पहा. ती अत्यंत घाण दिसतील. पंचतारांकित हॉटेलातील शौचकुपे चकाचक असतात. पंचतारांकित हॉटेलात जाणारे लोक फार सुसंस्कृत असतात म्हणून तेथे स्वच्छता असते, असे नव्हे. तसेच झोपडपट्टीत राहणारे असंस्कृत असतात असेही नव्हे. हा भाग पुन्हा आर्थिक स्थितीशी संबंधित आहे. पंचतारांकित हॉटेलात स्वच्छता टिकवून ठेवणारी यंत्रणा निर्माण करता येते कारण त्यांची तेवढी

**पान क्र. १६ पाहा**

# स्वतंत्र भारत पक्ष औरंगाबाद जि.प. निवडणुकीत १० जागा लढवणार

औरंगाबाद : औरंगाबाद जिल्हा शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या दि. २० डिसेंबर २०११ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत शेतकरी संघटना समर्थित स्वतंत्र भारत पक्षाने जि. प.च्या १० जागा व पंचायत समितीच्या २१ जागा लढविण्याचा निर्णय घेतला असून पैठण तालुक्यात जि.प.च्या २ व पंचायत समितीच्या ४ जागा, वैजापूर तालुक्यात जि.प.च्या ३ जागा व पं.स.च्या ६ जागा, गंगापूर तालुक्यात जि.प.च्या ३ जागा व पं.स.च्या ६ जागा, कन्नड तालुक्यात जि.प.ची १ जागा व पं.सं.च्या २ जागा आणि औरंगाबाद तालुक्यात पं.स.ची १ जागा लढविण्याचे एकमताने ठरविण्यात आले. ही बैठक ॲड. वा.स. चटप, प्रांताध्यक्ष स्व.भा.प. यांच्या अध्यक्षतेखाली व सौ. शैलाताई देशपांडे, प्रांताध्यक्षा शेतकरी महिला आघाडी, कैलास तवार बळिराज्य मराठवाडा प्रमुख, ॲड. सा. मा. पंडित, मराठवाडा वकिल आघाडी प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. शासनाने कापूस, धान, सोयाबीन, तूर यांचे हमीभाव न वाढविल्यास तीव्र आंदोलन करण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला. कर्जमुक्ती आंदोलनाला गती देऊन तीव्र करण्याचा संकल्पही सोडण्यात आणि वीजबिलातून शेतकऱ्यांची कायम मुक्तता करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. बैठकीला शेतकरी संघटना, स्वतंत्र भारत पक्ष व युवा आघाडीचे जिल्ह्यातील व नगरातील सर्व अध्यक्ष व इतर पदाधिकारी आणि नेते, कार्यकर्ते प्रामुख्याने हजर होते. मा. शरद जोशी यांना चतुरंगचा जीवनगौरव पुरस्कार नुकताच मिळाल्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# गोयगांव व धोपटाळा या दोन्ही ग्रा. पं.ची उपसरपंच पदे संघटनेकडे

चंद्रपूर : जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील गोयगांव व धोपटाळा या दोन्ही ग्रामपंचायतीच्या नुकत्याच झालेल्या सरपंच व उपसरपंच पदाच्या निवडणुकीत शेतकरी संघटना समर्थित स्वतंत्र भारत पक्षाने बाजी मारली असून गोयगाव ग्रा. पं.च्या उपसरपंच पदी शेतकरी संघटनेचे श्री. अरुण गौरकर यांची ईश्वर चिठ्ठीने निवड झाली असून धोपटाळा ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी कामगार नेते व शेतकरी संघटनेचे खंदे कार्यकर्ते रमेश रणदिवे हे काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करून विजयी झाले. या दोन्ही उपसरपंचपदी झालेल्या निवडीबद्दल ॲड. वा.स. चटप, प्रभाकर, दिवे, अनिल ठाकुरवार, विलास मोरे, विजय निरंजने, सौ. कमलताई वडस्कर, सौ. पूर्णीमाबाई निरंजने, आबाजी पा. ढवस, सौ. तेजस्विनी कावळे, शेषराव बोंडे, प्रभाकर ढवस, विनोदबाबू बारसिंगे, इंजि. पि. यु. बोंडे, ॲड. राजेंद्र जनेकर, सौ. सुमनताई पोडे, चिन्नु मामा फुरसंगे, वासुदेवराव बुटले, भाऊराव बोबडे, सुधाकर गिलबिले, हरिदास बोरकुटे, सौ. छाया रामगिरवार यांनी अभिनंदन केले आहे.

# शेरज (बु.) सोसायटीवर शेतकरी संघटनेचा झेंडा

चंद्रपूर : कोरपना तालुक्यातील (जिल्हा चंद्रपूर) शेरज (बु.) सेवा सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत शेतकरी संघटना समर्थित स्वतंत्र भारत पक्षाचे ७ सदस्य विजयी झाले असून त्या सोसायटीच्या अध्यक्षपदी बाबा पाटील साखरकर यांची अविरोध निवड झाली आहे. त्या सोसायटीत संघटनेचेच अरुण साखरकर, आनंदराव साखरकर, सुनील बोरडे, राजकुमार देरकर, मनोहर साखरकर व मनोहर पा. बोबडे हे विजयी झाले आहेत. या सर्व विजयी अध्यक्ष संचालकांचे कोरपना तालुका शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी, शेतकरी युवा आघाडी व स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# कोदेपूर सोसायटीवर पुन्हा शेतकरी संघटनेचाच झेंडा

नुकत्याच पार पडलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील जिवनी तालुक्यातील कोदेपूर आदीवासी विविध कार्यकारी सोसायटीच्या अटीतटीच्या निवडणुकीत शेतकरी संघटना समर्थित स्वतंत्र भारत पक्षाने १३ पैकी १२ जागा जिंकून घवघवीत यश संपादीत केले असून या सोसायटीच्या अध्यक्षपदी भोजू पाटील आत्राम हे अविरोध निवडून आले आहेत. या सोसायटीच्या सर्व संचालकांचे व अध्यक्ष, उपाध्यक्षांचे ॲड. वा. स. चटप, प्रभाकर दिवे, प्रा. अनिल ठाकुरवार, गणपत आडे, सौ. रुखमाबाई राठोड, बाजीराव पा. वल्का, तुकाराम पा. सिडाम, सौ. रागिनी कांबळे, दत्तात्रय माने, दत्ता राठोड, विठ्ठलराव राठोड, सोनेराव पेंदोर, अशोक नामपल्ले, देविदास वारे, शंकर निकोरे, पंडू दादा पवार, तातेराव नामपल्ले, नागनाथ अप्पा शेटकर, होनेराव आप्पा, मच्छींद्र मानकर, बाबूराव पा. चिकटे, शंकरमामा जोंधळे, हरिश्चंद्र भुतगे, खंडूजी सोलनकर, दत्ता. पा. बोडगीर, बालाजी सुर्यवंशी, डॉ. गंगाधर तोगरे, उत्तम राठोड, सायसराव कुंडगिर, पंडित कामळे, बालाजी पा. नरोटे, बाबूराव आमनर, विठ्ठल जाधव, देवेंद्र तुराणकर, दशरथ पा. मडावी, अनिल बल्की, चंदू पा. वुईके, नरूसिंग हामणे, पंडू पा. ठोंबरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# 'एस.ई.झेड.' च्या विरोधात निदर्शने करणाऱ्या शेतकऱ्यांची निर्दोष मुक्तता

**औरंगाबाद (प्रतिनिधी)** : शासनाने विशेष आर्थिक क्षेत्राच्या नावाखाली औरंगाबाद परिसरातील आडगाव, झाल्टा, चिंचोळी, गांधेली, बाळापूर इत्यादी गावांची ६५०० एकर जमीन अधिग्रहण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. शासनाच्या या शेतकरी विरोधी धोरणास शेतकरी संघटनेने सुरुवातीपासूनच विरोध केला आहे.

दि. १८ सप्टेंबर २००६ रोजी चंपावती हॉटेल, जालना रोड येथे, औरंगाबाद-जालना रोड चौपदरीकरण, औरंगाबाद-वडाळा चौपदरीकरण तसेच चिकलठाणा ते सावंगी वळण रस्त्याचे भूमिपूजन माजी मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्यावेळी एस.ई. झेडला विरोध करण्यासाठी शेतकरी संघटनेचे नेते कैलास तवार यांच्या नेतृत्वाखाली १) दशरथ शेषराव वाघ, २) राजेंद्र भानूदास डवले, ३) धर्मराज बाबासाहेब नागरे, ४) गणेश पांडूरंग खटके, ५) विठ्ठल राधाकृष्ण लोखंडे, ६) दत्तात्रय गंगाधर काकडे, ७) रेवन भवर, ८) राजू नामदेव म्हस्के यांसह इतर १० ते १५ गैर कायद्याची मंडळी बनवून 'शेतकरी संघटनेचा विजय असो' जमीन आमच्या मालकीची नाही कुणाच्या बापाची' अशा घोषणा दिल्या. म्हणून वरील लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता व विद्यमान ११ वे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, स.गौ. कोरे यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. वरील प्रकरणात एकूण ३ साक्षीदार तपासण्यात आले. सुनावणीच्यावेळी आरोपीच्या वतीने युक्तिवाद करताना ॲड. सा.मा. पंडित यांनी मा. न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदारामार्फत शाबीत झालेला नाही, तसेच घटनेच्या वेळी औरंगाबाद शहरामध्ये जमावबंदी आदेश लागू होता त्याबाबत जाहीर प्रगटन केल्याबाबत व दवंडी घेऊन औरंगाबाद शहरातील नागरिकांना जमावबंदी आदेशाची माहिती दिल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब अभियोग पक्ष हा आरोपींवरील दोषारोप संशयाच्या पलीकडे शाबीत करण्यास असमर्थ ठरल्याने बंधनकारक तरतूदीचे सरकार पक्षाने उल्लंघन केले आहे. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे अशी न्यायालयास विनंती केली.

वरील युक्तिवाद गृहीत धरून विद्यमान ११वे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी स.ग. कोरे यांनी वरील शेतकऱ्यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड. सा. मा. पंडित यांनी काम पाहिले. या मा. न्यायालयाच्या निर्णयाचे शेतकरी वर्गातून सर्वत्र स्वागत होत असून, औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकरी वर्गात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

पान क्र. १४ वरून पुढे

आर्थिक कुवत असते. गरीबांना मिळालेली संरचना टिकवून धरण्याची ऐपत नसते. ही ऐपत नसेल तर कितीही संरचना केल्या तरी त्याचा उपयोग तळातील लोकांना कमी व वरच्या लोकांना जास्त होतो. मुख्यमंत्री बदलून प्रश्न सुटला नाही, वैधानिक मंडळांचा सार्थक उपयोग झाला नाही, तसेच अनुशेषाचे आकडे काढून अंदाजपत्रकात तरतूदी करूनही फारसे साधले जाणार नाही. मराठवाड्यातील लोकांच्या खिशात येणाऱ्या पैश्याचे जे मार्ग अवरुद्ध करण्यात आले आहेत, ते मोकळे केले तर कदाचित विकासाचा नैसर्गिक मार्ग खुला होईल.

यासाठी काय करावे लागेल? चीनच्या तैवान भागात असा एक प्रयोग झाला व तो आश्चर्यकारकरित्या यशस्वी झाला. दुसऱ्या महायुद्धात लढलेल्या सैनिकांना तैवान भागात जमिनी दिल्या होत्या. खूप झटले तरी त्यांची परिस्थिती सुधारत नव्हती. ते सैनिक होते. सरकारकडे गेले. तेथे त्यांनी विकासाचा अनुशेष मागितला नाही. सोयी सुविधा मागितल्या नाहीत. ते म्हणाले, 'आम्हाला आमचा धंदा मोकळेपणाने करू द्या. त्यावरचे निर्बंध काढून टाका.' सरकार ते सरकारच! चीनचे असो की अणखीन कोणत्या देशाचे. आधी तयार झाले नाही. नंतर मोठी घासाघीस करून तयार झाले. फक्त तैवान या प्रदेशापुरता त्यांनी निर्णय घेतला. निर्णय काही देण्याचा नव्हता, उलट लादलली बंधने काढून घेण्याचा होता. त्या प्रदेशावरील लायसन्स, परमिट आणि कोट्याची सर्व बंधने त्यांनी काढून घेतली व म्हटले 'हा प्रदेश आज पासून स्पेशल इकॉनॉमिक झोन झाला.' सरकारी बंधने हटताच त्या भागात विद्युतवेगाने प्रगती झाली. शेतीची भरभराट झाली. अनेक उद्योग निर्माण झाले. असंख्य रोजगार निर्माण झाले. हा प्रयोग सफल झाल्यानंतर चीनने विविध भागात शेकडो 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' निर्माण केले. या 'सेझ'साठी त्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण केल्या नाहीत की त्या भांडवलदारांना विकासाला दिल्या नाहीत. कारखानदारांना मोफत वीज दिली नाही की पाणी नाही. निर्बंध तेवढे दूर केले. भारतात ज्या 'सेझ'ची चर्चा आहे ते या कल्पनेचे निव्वळ विकृतीकरण आहे. येथे शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण करून त्या भांडवलदारांना देण्यात आल्या. भारतातील सेझ आणि सेझची मूळ कल्पना यात जमीन आस्मानचे अंतर आहे. भारतातील सेझ हा सरकारी हस्तक्षेपाने केला जातो आहे मूळ कल्पनेत सरकारी हस्तक्षेप नाही. तेथे लोक अभिक्रमाला महत्व दिले आहे.

मराठवाड्याच्या विकासाला चालना द्यायची असेल तर सरकारी निर्बंधे दूर करणे हाच त्यावरचा उपाय होऊ शकतो. परंतु या मागणीच्या वाटेने जायला आमचे तथाकथित सरकारी पंडित तयार नाहीत कारण लोक आपला आपण विकास करू लागले तर यांना कोण विचारणार? आमचे लोकप्रतिनिधी तयार होणार नाहीत कारण असे झाले तर त्यांना 'मलीदा' मिळणार नाही. सरकारी अधिकाऱ्यांना तर हे नकोच आहे कारण निर्बंध आहेत म्हणूनच त्यांची वरकमाई आहे. निर्बंध उठल्यावर वरकमाई कोठून मिळणार? सरकारच्या आयत्या बिळावर बसलेले हे नागोबा आपली मक्तेदारी सोडायला तयार नाहीत. तेच खरे मराठवाड्याच्या विकासाचे मारेकरी आहेत.

'मराठवाड्याचा विकास' हा विषय तडीला न्यायचा असेल तर तथाकथित संरचनेच्या मागण्या, अनुशेषाचे आकडे या जंजाळातून बाहेर पडूनच विचार करावा लागेल व हे आयत्या बिळावरचे नागोबा ठेचून काढावे लागतील.

**अमर हबीब**
अंबर, हाऊसिंग सोसायटी,
अंबाजोगाई- ४३१५१७ (जि.बीड)
मो. ९४२२९३१९८६

■■